सकाळ

# महाडिक अभियांत्रिकी, क्विक हिलमध्ये करार

इस्लामपूर, ता. ८ : पेठ (ता. वाळवा) येथील नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालय व क्विक हिल, पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. सचिव राहुल महाडिक प्रमुख उपस्थित होते.

'सायबर सिक्युरिटी अवेअरनेस' विषयावर कार्यशाळा झाली.

सहायक पोलिस निरीक्षक गजानन कांबळे, क्विक हिल (पुणे) च्या श्रीमती सुगंधा दाणी, कार्यकारी संचालक प्रा. महेश जोशी, प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी उपस्थित होते. श्री. कांबळे यांनी सायबर गुन्हे, पार्श्वभूमी व आवश्यक काळजी या विषयी मार्गदर्शन केले.

श्रीमती दाणी म्हणाल्या, ''सामंजस्य करारांतर्गत महाडिक अभियांत्रिकीच्या माध्यमातून सुमारे १५ हजार ५०० शालेय विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटी विषयावर केलेले मार्गदर्शन कौतुकास्पद आहे.'' गुणवत्तापूर्ण तंत्रशिक्षणाबरोबरच विविध नामांकित कंपन्यांशी महाविद्यालयाचा करार झाला आहे. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग, सर्टिफिकेशन व प्लेसमेंटसाठी फायदा होणार असल्याचे मत संस्थेचे प्रा. जोशी यांनी सांगितले. सायबर सिक्युरिटी ही काळाची गरज असून याविषयी जनजागृती व्हावी यासाठी कार्यशाळा फायदेशीर आहे, असे मत प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशनची कार्यकारिणी समिती स्थापन करण्यात आली. विभागप्रमुख प्रा. इम्रान इनामदार यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संयोजन केले.